मुख्यलेखाशीर्ष ४०५५ मधील उपलेखाशीर्षाचे परिभाषिक नामकरण बदलणेबाबत..

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः सीसीटी-३६१५/प्र. क्र. २०४/पोल-३

मंत्रालय, दुसरा मजला, मुख्य इमारत,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मुंबई-४०० ०३२
दिनांक: १२ जानेवारी २०१६

वाचा:

१) वरीष्ठ लेखा अधिकारी, प्रधान महालेखाकार (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र यांचे क्र. ख. वि/चा-१/गृह विभाग/युओआर-७९/२०१५-१६/६५०,दि.१४.८.२०१५ चे पत्र.

२) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. पुरक-२०१५/प्र. क्र. २०१/अर्थसंकल्प-३, दि.१.१.२०१६.

प्रस्तावना:

सद्यस्थितीमध्ये पोलीस आयुक्त, पुणे शहर तसेच पोलीस आयुक्त, मुंबई शहर यांचे कार्यक्षेत्रांतर्गत, कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे, अतिरेक्यांच्या कारवाया रोखणे, धार्मिक कार्यक्रम व मिरवणुकांवर नियंत्रण ठेवणे, वाहतुकीचे नियंत्रण करणे तसेच संवेदनशील भागावर नियंत्रण ठेवणे यासाठी कायमस्वरुपी सीसीटीव्ही सर्व्हिलन्स यंत्रणा बसविण्यात येत आहे. त्याचप्रमाणे नाशिक-त्र्यंबकेश्वर याठिकाणी सिंहस्थ कुंभमेळा विचारात घेता कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी तात्पुरत्या स्वरुपात सीसीटीव्ही यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे. राज्यातील विविध शहरांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याची घोषणा शासनाने केली आहे. तसेच मा. मुंबई उच्च न्यायालयाने राज्यातील सर्व पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याबाबतचे आदेश दि.१३.८.२०१४ रोजी दिले आहेत.

उपरोक्त वस्तुस्थिती विचारात घेता, वेगवेगळया प्रसंगी/ठिकाणी सीसीटीव्हीचा खर्च भागविण्यासाठी स्वतंत्र लेखाशीर्ष अथवा उपलेखाशीर्ष निर्माण करण्याऐवजी प्रशासकीय सोयीसाठी "मागणी क्रमांक बी-१०, ४०५५, पोलीस यावरील भांडवली खर्च, (००) (०९) सार्वजनिक ठिकाणी सीसीटीव्ही संनियत्रणे बसविणे (४०५५ ०२२३)" या लेखाशीर्षाचे परिभाषिक नामकरण (Nomenclature) बदलणेबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय:

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र यांनी संदर्भाधीन पत्रान्वये मुख्य लेखाशीर्ष ४०५५ या लेखाशीर्षाचे परिभाषिक नामकरण (Nomenclature) बदलणेस मान्यता दिली आहे. लेखाशीर्षामधील करावयाचा बदल विधानमंडळाच्या निदर्शनास आणणेसाठी विधानमंडळाच्या डिसेंबर २०१५ च्या अधिवेशनामध्ये लाक्षणिक पुरवणी मागणी सादर केली होती. सन २०१५-२०१६ या वर्षांचे खर्चाचे विवरणपत्र दि.८.१२.२०१५ रोजी विधानमंडळास सादर करण्यात आले होते. वित्त विभागाने

संदर्भाधीन क्र. २ वरील दि.१.१.२०१६ चे शासन परिपत्रकान्वये, पुरवणी खर्चास विधानसभेने मान्यता दिली असल्याचे तसेच पुरवणी विनियोजन विधेयकास मा. राज्यपालांनी संमती दिली असल्याचे आणि ते महाराष्ट्र (तृतीय पुरवणी)विनियोजन अधिनियम, २०१५ (सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक-४१) म्हणून महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण, भाग-४, दि.२१.१२.२०१५ यामध्ये प्रसिध्द करण्यात आले असल्याने, मुख्य लेखाशीर्ष ४०५५ या लेखाशीर्षाचे परिभाषिक नामकरण (Nomenclature) बदलणेस खालीलप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे :-

For	Read
4055-Capital Outlay on Police-800-Other Expenditure (00)(09)-Installation of CCTV Surveillance System in Public Places. CRC(40550223)	4055-Capital Outlay on Police-800-Other Expenditure (00)(09)-Installation of CCTV Surveillance System. CRC(40550223)

२. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र. ३९८/१५/व्यय-७, दि.३.९.२०१५ आणि महालेखापाल, मुंबई यांच्या अनौपचारीक संदर्भ क्र.ख. वि/चा-१/गृह विभाग/युओआर-७९/२०१५-१६/६५०, दि.१४.८.२०१५ अन्वये दिलेल्या सहमतीने निर्गमीत करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०११२१७२३३१३६२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

KADAM DATTATRAY HANMANT

Digitally signed by KADAM DATTATRAY HANMANT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPT,CID - 918120, postalCode=400032, st=Maharashtra, cn=KADAM DATTATRAY HANMANT
Date: 2016.01.12 17:25:47 +05'30'

(द. ह. कदम)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई
३. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, मुंबई
४. समादेशक, गृहरक्षक व नागरी संरक्षण दल, मुंबई
५. महासंचालक व व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई
६. सर्व अपर पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई

७. सर्व पोलीस आयुक्त
८. सर्व विशेष पोलीस महानिरीक्षक
९. सर्व पोलीस उप महानिरीक्षक
१०.सर्व पोलीस अधीक्षक
११.सर्व पोलीस प्रशिक्षण महाविद्यालये
१२.सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल
१३.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा)-१/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
१४.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१५.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१६.निवासी लेखा परीक्षा अधिकारी
१७.वरीष्ठ लेखा अधिकारी, प्रधान महालेखाकार (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई, २ रा मजला, प्रतिष्ठा भवन, न्यु मरीन लाईन्स, १०१, महर्षी कर्वे मार्ग, मुंबई-२०
१८. कक्ष अधिकारी(अर्थसंकल्प-११/व्यय-७) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
१९. अवरसचिव व अर्थसंकल्प कक्ष, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
२०. निवडनस्ती, पोल-३